मतदानाचा श्रीगणेशा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : यंदाच्या लोकसभा निवडणुकीत ८५ वर्षांवरील वृद्ध आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असणाऱ्या मतदारांना घरबसल्या मतदानाची सुविधा उपलब्ध झाली आहे. त्या अंतर्गत दिंडोरी लोकसभा मतदारसंघात गुरुवारपासून चांदवड आणि निफाड या विधानसभा मतदारसंघात घरबसल्या मतदानास सुरुवात झाली. दिवसभरात चांदवडमध्ये ३२ तर निफाडमध्ये ४० अशा एकूण ८८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी निवडणूक आयोगाकडून विविध उपक्रम राबविले आहेत. त्या अंतर्गत केंद्रावर जाऊ न शकणाऱ्या वृद्ध आणि अपंग मतदारांना घरबसल्या मतदानाची सुविधा लोकसभा निवडणुकीत प्रथमच उपलब्ध करण्यात आली. एरवी निवडणूक प्रक्रियेत सहभागी कर्मचारी आणि सैन्य दलातील मतदारांना टपाली मतदान करता येते. नव्याने समाविष्ट झालेल्या घटकांना ही सुविधा वैकल्पिक स्वरुपाची आहे. केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत (बीएलओ) वृद्ध आणि अपंग मतदारांना घरी १२ 'ड' अर्जांचे वितरण करण्यात आले होते. ज्यांनी मतदार घरबसल्या मतदानाचा पर्याय निवडला, त्यांना या सुविधेचा लाभ देण्याची व्यवस्था करण्यात आली. नाशिक जिल्ह्यात ८५ वर्षांवरील ६४ हजार ७५७ वृद्ध तर २३ हजार ४३४ अपंग असे एकूण ८८ हजार १९१ मतदार आहेत. यापैकी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सरासरी २५० मतदारांनी घरबसल्या मतदानाचा पर्याय निवडला. जिल्ह्यात या पद्धतीने सुमारे साडेतीन हजार मतदार मतदान करणार आहे.

याची सुरुवात गुरुवारी दिंडोरी मतदारसंघातून झाली. या नव्या पद्धतीच्या मतदानासाठी खास पथकांची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक पथकात मतदान केंद्राध्यक्ष दर्जाचा अधिकारी, केंद्रस्तरीय अधिकारी, मदतनीस, पोलीस आणि चित्रीकरण करणारी व्यक्ती यांचा समावेश आहे. यावेळी उमेदवाराचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात. '१२ ड' अर्जाद्वारे टपाली मतदानाचा पर्याय निवडणाऱ्या चांदवड व निफाड विधानसभा मतदारसंघातील मतदारांच्या घरी पथक गेले. संबंधितांच्या घरातच मतदान केंद्रासदृश रचना करण्यात आली. मतपत्रिकेवर संबंधिताने मत नोंदविल्यानंतर मतपत्रिकेची नियमानुसार घडी घालून पाकिटबंद केली जाते. निवडणूक यंत्रणेने दिलेल्या माहितीनुसार चांदवडमध्ये ३२ आणि निफाडमधील ४० अशा एकूण ८८ मतदारांनी मतदान केले. यात १६ अपंग मतदारांचा समावेश होता. या मतदानाच्या माध्यमातून लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचा शुभारंभ झाला आहे.

वृद्ध, अपंगांना लाभ

मतदान केंद्रावर जाऊ न शकणाऱ्या वृद्ध आणि अपंग मतदारांना घरबसल्या मतदानाची सुविधा लोकसभा निवडणुकीत प्रथमच उपलब्ध करण्यात आली. केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत वृद्ध आणि अपंग मतदारांना घरी १२ 'ड' अर्जांचे वितरण करण्यात आले होते. ज्यांनी मतदार घरबसल्या मतदानाचा पर्याय निवडला, त्यांना या सुविधेचा लाभ देण्याची व्यवस्था करण्यात आली. नाशिक जिल्ह्यात ८५ वर्षांवरील ६४ हजार ७५७ वृद्ध तर २३ हजार ४३४ अपंग असे एकूण ८८ हजार १९१ मतदार आहेत. यापैकी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सरासरी २५० मतदारांनी घरबसल्या मतदानाचा पर्याय निवडला. जिल्ह्यात या पद्धतीने सुमारे साडेतीन हजार मतदार मतदान करणार आहेत.

उष्म्यामुळे मनमाडकरांचे हाल

मनमाड : वाढते ऊन मनमाडकारांची पाठ सोडायला तयार नाही. चार दिवसापासून मनमाड शहर आणि परिसराचा तापमानाचा पारा ४० अंशापेक्षा अधिक आहे. बुधवारी शहराचे तापमान ४० अंश इतके होते. ऐन दुपारी शहराच्या काही भागाचा वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांच्या हालअपेष्टात अधिकच भर पडत आहे. सायंकाळी उशिरापर्यंत उन्हाचा झळा बसत होत्या. ऊन व उकाड्याने नागरिक त्रस्त झाले असून उन्हापासून बचाव करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जात आहेत. शहर आणि परिसरामध्ये दीड महिन्यापासून उन्हाने अक्षरशः कहर केला आहे मार्चच्या अखेरीस आठवड्यापासून उन्हाचा तडाखा अधिकच वाढला आहे. संपूर्ण एप्रिल महिना शहराचे तापमान ३९ ते ४० दरम्यान होते. उन्हामुळे जनजीवन मोठ्या प्रमाणावर प्रभावित होत आहे. कडक उन्हातच लग्न सोहळ्यांना हजेरी लावावी लागत आहे उन्हाचे चटके आणि झळा तीव्र झाल्यामुळे दुपारी १२ ते सायंकाळी पाच या वेळेत रस्त्यावरची वर्दळ एकदम कमी झाली. नागरिकांनी पंखे, कुलर लावून घरात बसणे पसंत केले. गेल्या आठवड्यापासून रोज उन्हाचा पारा सातत्याने वाढत आहे. रसवंतीगृहावर दिवसभर गर्दी असते. याशिवाय मठ्ठा, लस्सी, ताक याची चव चाखत अनेक जण उन्हापासून दिलासा मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

'मविआ'चा जनआंदोलनाचा इशारा

सुधाकर बडगुजर यांच्यावरील कारवाईचा निषेध

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरू असताना शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांना बजावण्यात आलेली तडीपारीची नोटीस म्हणजे राजकीय आकस आहे. या नोटीसचा निषेध करुन कारवाई मागे न घेतल्यास जनआंदोलन छेडण्याचा इशारा महाविकास आघाडीने दिला आहे. याबाबत 'मविआ'तर्फे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांना निवेदन देण्यात आले.

निवडणूक प्रचार रंगात आला असतानाच बडगुजर यांना तडीपारीची नोटीस देण्यात आल्याने मविआचे पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात त्यांनी आपली बाजू मांडली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी बडगुजर हे जिल्ह्याचे स्टार प्रचारक आहेत. नाशिक मतदारसंघातील ठाकरे गटाचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या निवडणूक प्रचाराची संपूर्ण धुरा बडगुजर यांच्या खांद्यावर आहे. वाजे यांच्या प्रचारासाठी बडगुजर वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न करत असतांना त्यांना ऐन निवडणुकीच्या धामधुमीत बजावण्यात आलेल्या तडीपारीच्या नोटीसमुळे खळबळ उडाली आहे.

गुरूवारी महाविकास आघाडीची बैठक शिवसेना कार्यालयात झाली. बैठकीस बडगुजर तसेच राष्ट्रवादीचे गजानन शेलार, नितीन भोसले आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. काँग्रेस पदाधिकाऱ्यांची मात्र अनुपस्थिती होती. काँग्रेस शहराध्यक्ष आकाश छाजेड धुळे येथे असल्याने उपस्थित नव्हते. इतर पदाधिकारीही बैठकीस आले नाहीत. बैठकीत प्रचाराची पुढील रणनीती ठरविण्यात आली. ठाकरे गटाला नामोहरम करण्यासाठी पोलीस प्रशासनाने बडगुजर यांच्यावर केलेली कारवाई अयोग्य आहे. तडीपारी गुन्हेगाराची अथवा नागरिकांना त्रास देणाऱ्या व्यक्तीची केली जाते. परंतु, बडगुजर हे लोकसेवक तसेच सामाजिक कार्य करणारे व्यक्तिमत्व आहे. त्यांच्यावर दाखल झालेले गुन्हे राजकीय परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या वादातील आहेत. तडीपारीच्या नोटिसीत एक ते चार गुन्हे दर्शविले आहेत. न्यायालयाने त्यातून बडगुजर यांची मुक्तता केली आहे. एका प्रकरणात उच्च न्यायालयात याचिका दाखल आहे. एकूण १० वर्षांच्या कार्यकाळात बडगुजर यांच्यावर एकही गुन्हा दाखल नाही.

सलीम कुत्ता या गुन्हेगाराबरोबरच्या पार्टी प्रकरणी बेकायदेशीर कृत्य केल्याचा एक गुन्हा यावर्षी त्यांच्यावर दाखल झाला आहे. अशा एका गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर तडीपारीची नोटीस काढणे योग्य नाही. अनेक राजकीय व्यक्तींविरोधात अशाच प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. परंतु त्यांच्यावर अशी कोणतीही कारवाई झाल्याचे निदर्शनास येत नाही. मग बडगुजर यांच्यावरच अशी कारवाई का, असा प्रश्न पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्तांना भेटलेल्या शिष्टमंडळात ठाकरे गटाचे सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, महानगरप्रमुख विलास शिंदे, माजी आमदार वसंत गिते, नितीन भोसले, शरद पवार गटाचे गजानन शेलार, डी. जी. सूर्यवंशी, संजय चव्हाण आदी उपस्थित होते. पोलीस आयुक्त कर्णिक यांनी याबाबत कायद्याच्या चौकटीत राहून योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन शिष्टमंडळास दिले.

येवल्यात वैद्यकीय आघाडी संवाद मेळावा

नाशिक : येवला तालुका भाजप वैद्यकीय आघाडी संवाद मेळावा सिद्धार्थ लॉन्स येथे आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. अभय निकम, उपाध्यक्ष डॉ. अरुण कातकाडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उत्तर महाराष्ट्र प्रमुख डॉ. प्रशांत पाटील, जिल्हा सरचिटणीस आनंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी, दिंडोरी मतदारसंघातील उमेदवार डॉ. भारती पवार यांना येवल्यातून एक ते सव्वा लाख मताधिक्य देण्याचा निश्चय करण्यात आल्याचे येवल्याचे डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष चंद्रशेखर क्षत्रिय यांनी सांगितले.

महाराष्ट्र ग्रामीण बँक — मागणी सूचना

मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. ४२, गट क्र. ३३, (भाग), गोलवाडी गाव, ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर -IV, सिडको, छत्रपती संभाजीनगर -४३११३६. **क्षेत्रीय कार्यालय :** पुणे

निम्नस्वाक्षरीकर्ता, सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स् ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरीटी इंटरेस्ट ऐक्ट २००२, उक्त कायदा नियम १३/२ अंतर्गत **प्राधिकृत अधिकारी / क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, क्षेत्रीय कार्यालय : पुणे (शाखा : अहमदनगर)** चे असून थकीत कर्ज ज्या कर्जदाराचे नावे आहे त्यांची नांवे खालील सारणीत दिलेली आहेत. तसेच गहाण ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचा तपशीलही देण्यात आलेला आहे. तारणदारांनी सदर मालमत्ता गहाण ठेवलेली असून संबधित कर्जदाराला, जामीन देणाऱ्या जामीनदाराची नांवे सारणीमध्ये दिलेली आहेत. कर्जदार यांनी मंजुरीच्या अटीचे पालन न केल्याने तुमचे खाते अनियमित झालेले आहे. आर.बी.आय. च्या मार्गदर्शक तत्वानुसार त्यांचे अकार्यक्षम खाते म्हणून वर्गीकरण करण्यात आलेले आहे. खाते अकार्यक्षम झाल्याचा दिनांक तसेच मागणी सुचना जारी केलाचा दिनांक खालील सारणीत दर्शविण्यात आलेला आहे. निर्देशित अदत्त रक्कम ज्या तारखेपर्यंत व्याजासह येणेबाकी व्याज अधिक शुल्क व अधिभार इ. खालील रक्कमेचा भरणा करावा अन्यथा खालील सुरक्षा मालमत्ताबाबत अधोहस्तांक्षरित हे योग्य कार्यवाही करू शकतील.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव व पत्ता व कर्ज खाते क. आणि जामीनदाराचे नाव व पत्ता	मागणी सूचनेचा दिनांक	अदत्त रक्कम रुपये	चल/अचल मालमत्तेचे चतु: सिमेसह विवरण	शाखेचे नाव
1)	**कर्जदार : श्री. नितीन रघुनाथ सोनमाळी** **प्रोप्राय्टर- वेदान्त एलेक्ट्रिकल्स** मु . पो. बी २ स्वामी समर्थ प्लाझा दिल्लीगेट, अहमदनगर , जिल्हा अहमदनगर - ४१४००१ **जामीनदार : १) श्री. बाळासाहेब भागवत सोनमाळी** पत्ता :- प्लॉट नं ५,मेवादन नगर , कल्याणरोड अहमदनगर - ४१४००१ **२)सौरभ बाळासाहेब शेवाळे** पत्ता :- सुदानवाडी, भोरसार, छ. संभाजीनगर - ४२३७०३ **कर्ज खाते क. ८००८११०६८२४**	**दिनांक ३०/०४/२०२४ खाते अकार्यक्षम झाल्याचा दि. २९/०४/२०२४**	दि. ३०/०४/२०२४ वरील **रु. ९९७२२५.७०/-** + दि. १/०४/२०२४ पासूनचे प्रलंबीत व्याज व इतर खर्च	नलेगाव, जि. अहमदनगर येथील बिगर कृषि क्षेत्र गट क्रं २१, प्लॉट क्रं ३३, चे नोंदनिकृत गहाण खत **चतु:सीमा** उत्तर - ६ मी रोड पूर्व - प्लॉट क्रं ३४ दक्षिण - प्लॉट क्र३० पश्चिम - प्लॉट क्र ३२	**अहमदनगर**

उपरोक्त कर्जदार यांना सूचित करण्यात येते की, प्राधिकृत अधिकारी सरफेसी कायद्याच्या तरतुदीनुसार (SARFAESI ACT 2002) तारण मालमत्ता/ संरक्षित संपत्तीचा ताबा घेवून सदरील मालमत्ता लिलावाद्वारे विक्रीस काढतील तसेच जर नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसाचे आत उपरोक्त थकबाकी न फेडल्यास बँकेस असलेल्या कायदेशीर अधिकाराचा वापर करुन कोणतीही पूर्व सूचना न देता कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. सरफेसी कायदा कलम १३(१३) नुसार तुम्हास तारण मालमत्ता हस्तांतरण, विक्री करण्यास अथवा लीजवर देण्यास मनाई आहे.

दिनांक : १०/०५/२०२४
ठिकाण : पुणे
(टिप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)

प्राधिकृत अधिकारी / क्षेत्रीय व्यवस्थापक
महाराष्ट्र ग्रामीण बँक, क्षेत्रीय कार्यालय, पुणे

यूनियन बँक Union Bank of India — [Rule - 8(1)] ताबा नोटीस (फक्त स्थावर मालमत्तेसाठी)

क्रेडिट रिकव्हरी ॲण्ड लिगल सर्व्हिस डिपार्टमेंट
क्षेत्रीय कार्यालय: दि कॅपीटल बिल्डींग, पहिला मजला, कुलकर्णी गार्डन समोर, शरणपूर रोड, नाशिक.

ज्याअर्थी खालील सही करणार **युनियन बँक ऑफ इंडिया** चे अधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट (सेकंण्ड)ॲक्ट २००२ कायदा (२००२ चा कायदा नं.५४) आणि कलम १३(१२) अन्वये नियम ३ सह वाचता प्राप्त अधिकाराचा वापर करून सिक्युरिटी इंटरेस्टच्या (एन्फोर्समेंट) नियम २००२ नुसार मागणी सूचना केली होती. थकबाकी भरण्यासाठी मागणी नोटीस दिल्याचे तारखेपासून ६० दिवसांचे आत त्यावरील व्याज व इतर कायदेशीर खर्चासह भरण्यास सांगितले होते.

कर्जदार हे खालील रक्कम परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने कर्जदार आणि तमाम जनतेला सदरच्या नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, खाली सही करणार अधिकृत अधिकारी यांनी कलम १३(४) नियम ८ सह वाचता खालील नमूद तारखेनुसार मालमत्तेचा **प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.

कर्जदार आणि तमाम जनतेला सूचित करणेत येते की, खालील मालमत्तेबाबत कोणीही व्यवहार करू नयेत. केल्यास ते खालील थकीत रक्कम आणि व्याजासह **युनियन बँक ऑफ इंडिया** यांना देण्यास बांधील राहतील.

सुरक्षित मालमत्तेची पुर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, कायद्याच्या कलम १३च्या उप-कलम (८) च्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात आले आहे.

अ. क्र.	शाखा	कर्जदार/ जामिनदाराचे नाव	मागणी सुचनेचा दिनांक	प्रतिकात्मक ताबा घेतल्याचा दिनांक	मालमत्तेचे विवरण चतु:सिमेसह	मागणी सूचनेत निर्देशित केलेली रक्कम
1	**शहादा शाखा** जि.धुळे	कर्जदार- **श्री. रविंद्र संतोष चव्हाण**	01/02/2024	07/05/2024	खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे साधे गहाण: प्लॉट नं. १६ बी, क्षेत्र मोजमापीत १४४.३७ स्के.मी. स.नं.६१/२+१०१, कुकडेल, ता. शहादा, जि.नंदुरबार येथील जमिनीचा सर्व भाग व पार्सल. चतु:सिमा खालीलप्रमाणे **चतु:सिमा: पुर्वेस-** स.नं. १०२, **पश्चिमेस-** ९ मी. रोड, **दक्षिणेस-** स.नं. १०२, **उत्तरेस-** प्लॉट नं. १६/ए	**Rs. 20,19,535.98/-** + व्याज आणि त्यावरील खर्च
2	**शिरपुर शाखा** जि.धुळे	कर्जदार- **श्री. प्रकाश शांतीलाल गुजर** व जामिनदार **श्री. युवराज सुखदेव कोळी**	29/08/2023	07/05/2024	ग्रामपंचायत मालमत्ता नं. ६८/२, क्षेत्र मोजमापीत १२६० स्के.फु. (११७.१० स्के.मी.) खर्डे ब्रु., ता.शिरपुर, जि.धुळे येथील स्थित ग्रामपंचायत मालमत्ता जमिनीचा सर्व भाग व पार्सल खर्डे ग्रामपंचायत हद्दीत. (जी.पी.एच.नं. ६८/२; प्लॉट नं. -; क्षेत्र स्के.मी. १२६० स्के.फु. (११७.१० स्के.मी.); येथे स्थित खर्डे ब्रु.; चतु:सिमा पुर्वेस- जी.एच.बी.सी., पश्चिमेस- जी.एच.एस.एस., दक्षिणेस- रोड, उत्तरेस- रोड)	**Rs. 5,02,934.48/-** + व्याज आणि त्यावरील खर्च
3	**शिरपुर शाखा** जि.धुळे	कर्जदार- **श्री. योगेंद्र सुरेश कोळी व सौ. चेतना योगेंद्र कोळी**	25/01/2024	07/05/2024	खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे साधे गहाण: स.नं. १२५/१, मधील प्लॉट नं. २४, मोजमापीत २९६.०० स्के.मी. पैकी रो-हाऊस उत्तरेकडील बाजू क्षेत्र ८४.०० स्के.मी. खर्डे ब्रु., ता. शिरपुर, जि. धुळे येथील जमिनीचा सर्व भाग व पार्सल. चतु:सिमा खालीलप्रमाणे **चतु:सिमा: उत्तरेस-** प्लॉट नं. २३ बी, **दक्षिणेस-** प्लॉट नं. २४, **पुर्वेस-** प्लॉट नं. २७, **पश्चिमेस-** रोड	**Rs. 14,19,487/-** + व्याज आणि त्यावरील खर्च
4	**जळगांव शाखा** जि.जळगांव	कर्जदार- **श्री. विजय राजाराम कुलथे** जामिनदार- **सौ. पल्लवी विजय कुलथे**	08/11/2024	08/05/2024	खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे साधे गहाण: सर्व्हे नं.T.P.S-II बरील फ्लॅट नं.६, फायनल प्लॉट नं.२१४ मोजमापीत ४९.३६ स्के.मी. जळगांव, ता. व जि. जळगांव येथील जमिन व त्यावरील बांधीव मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल. चतु:सिमा खालीलप्रमाणे **चतु:सिमा: पुर्वेस-** फ्लॅट नं.५, **पश्चिमेस-** ओपन स्पेस, **दक्षिणेस-** ओपन स्पेस, **उत्तरेस-** रोड	**Rs. 4,63,045.18/-** + व्याज आणि त्यावरील खर्च
5	**जळगांव शाखा** जि.जळगांव	कर्जदार- **श्री. विजय मधुकर वाणी, सौ. वंदना विजय वाणी** जामिनदार- **श्री.अतुल नारायण बावीस्कर, श्री. युवराज उत्तम पाटील**	08/11/2024	08/05/2024	खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे साधे गहाण: सर्व्हे नं. ४३६/ए, ओपन प्लॉट नं. ९७, ७/१२ गोषवारा मधील ४६४.५१ स्के.मी. नविन सिटी सर्व्हे नं. ५९३२ मोजमापीत ४६२.६ स्के.मी. जय समधा रेसिडेन्सी, स्टिल्ट फ्लोअर, फ्लॅट नं.३, एकुण बिल्टअप क्षेत्र ५३.१० स्के.मी., मेहरूण शिवार शेत येथील जमिन व त्यावरील बांधीव मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल. **चतु:सिमा: पुर्वेस-** लिफ्ट व फ्लॅट नं.३, **पश्चिमेस-** ओपन स्पेस, **दक्षिणेस-** ओपन स्पेस, **उत्तरेस-** जिना व पॅसेज व फ्लॅट नं.४	**Rs. 5,12,766.11/-** + व्याज आणि त्यावरील खर्च
6	**जळगांव मेन शाखा** जि.जळगांव	कर्जदार- **श्री. मुकुंद जगन्नाथ कापुरे व सौ. सुरेखा मुकुंद कापुरे**	07/02/2024	08/05/2024	**मालमत्ता १:** खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे न्याय्य गहाण: फ्लॅट नं.८, मोजमापीत ३२.२६ स्के.मी. दुसरा मजल्यावर २६.०० स्के.मी. मयुरेश्वर अपार्टमेंटमध्ये ८.३३% कॉमन सुविधा आणि ॲमेनिटीज असलेली फ्लॅट नं. ४१, मोजमापीत ३१२.०० स्के.मी. गट नं. ३५५+१७४/ए पिंप्राळा शिवार, ता. व जि. जळगांव येथील मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील जळगांव, उप-नोंदणी कार्यालय जळगांव हद्दीत. **चतु:सिमा: पुर्वेस-** फ्लॅट नं.७, **पश्चिमेस-** फ्लॅटची मोकळी जागा नंतर फ्लॅट नं. ४२, **दक्षिणेस-** फ्लॅटची मोकळी जागा नंतर रोड, **उत्तरेस-** जिना व फ्लॅट नं.५ **मालमत्ता २:** खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे न्याय्य गहाण: फ्लॅट नं.७, मोजमापीत ३२.२६ स्के.मी. दुसरा मजल्यावर २६.०० स्के.मी. मयुरेश्वर अपार्टमेंटमध्ये ८.३३% कॉमन सुविधा आणि ॲमेनिटीज असलेली फ्लॅट नं. ४१, मोजमापीत ३१२.०० स्के.मी. गट नं. ३५५+१७४/ए पिंप्राळा शिवार, ता. व जि. जळगांव येथील मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील जळगांव, उप-नोंदणी कार्यालय जळगांव हद्दीत. **चतु:सिमा: पुर्वेस-** प्लॉटची मोकळी जागा नंतर प्लॉट नं.४०, **पश्चिमेस-** फ्लॅट नं.८, **दक्षिणेस-** जिना व फ्लॅट नं.६, **उत्तरेस-** प्लॉट नंतर रोडची मोकळी जागा	**Rs. 35,65,337.90/-** + व्याज आणि त्यावरील खर्च

दिनांक: १०.०५.२०२४
ठिकाण: धुळे, जळगांव
(टिप: स्वैर भाषांतर, तफावत असल्यास इंग्रजी ग्राह्य)

सही/-
अधिकृत अधिकारी,
युनियन बँक ऑफ इंडिया

TATA — टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ११ वा मजला, टॉवर 'ए', पेनिनसुला बिझिनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०० ०१३.
शाखा कार्यालय : दुसरा मजला, कंदी टॉवर, सी-विंग, जालना रोड, औरंगाबाद-४३१००१.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ८(६) व रुल ९(१) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव सूचना.

आम जनतेस आणि विशेषकरून यांखालील ऋणको / सह-ऋणको किंवा विशेषकरून त्यांचे विधि वारसदार / प्रतिनिधी (ऋणको) यांना याद्वारा सूचना देण्यात येते की, "**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**"कडे ("**टीसीएचएफएल**") गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा "टीसीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आलेला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली नमूद केलेल्या ऋणको व सह-ऋणकोंकडील थकीत देणींच्या वसुलीकरिता "**जसे आहे जेथे आहे**" व "**जसे आहे जे काही आहे**" आणि "**जे काही आहे तेथे आहे**" व "**कोणत्याही आधाराशिवाय**" या तत्त्वावर **१२.०६.२०२४** रोजी करण्यात येणार आहे. राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव खाली नमूद केली आहे. याद्वारा सूचना देण्यात येते की, विक्रीची तारीख पुढे ढकलणे/विक्री खंडीत होणे न झाल्यास, उक्त सुरक्षित मत्ता/मालमत्तेची विक्री उक्त **१२.०६.२०२४** रोजी **दु. ०२.०० वा. ई-लिलावा**द्वारा करण्यात येणार आहे. ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इरठेचा डिमांड ड्राफ्ट समाविष्ट मोहोरबंद लिफाफा, शाखेचा पत्ता "**टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.**" प्लॉट नं. १८३, दुसरा मजला, माझदा टॉवर, युनिट ०३, जीपीओ रोड, त्रिंबक नाका, नाशिक-४२२००१ येथे **११.०६.२०२४** रोजी **सायं. ०५.०० वा.पर्यंत किंवा तत्पूर्वी** "टीसीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारीकडे सादर करण्यात यावा.

सुरक्षित मत्ता/मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या संक्षिप्त तपशीलवार वर्णनानुसार "जसे आहे जेथे ज्या स्थितीत आहे" या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

अ. क्र.	लोन अका. नं.	ऋणको/ सह-ऋणको/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधी/ हमीदारांची नावे	मागणी सूचनेनुसार रक्कम	राखीव किंमत	इसारा रक्कम ठेव	ताब्याचा प्रकार
१)	९६८१११६	**शिवराज महादेव जाधव, प्रियांका शिवराज जाधव**	रु. १५,५३,९८४/- २६.१०.२०१७	रु. १८,९०,१००/- (रुपये अठरा लाख नव्वद हजार शंभर फक्त)	रु. १,८९,०१०/- (रुपये एक लाख एकोणनव्वद हजार दहा फक्त)	प्रत्यक्ष

स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - **अनुसूची-ए** : खुल्या जमिनीचे सर्व खंड व तुकडे मोजमापाची ८९ आर किंवा ८९८१.५४२ चौ.मी., येथे स्थित - गॅट नं. १४०, व्हिलेज तीसगाव, ता. व जि. औरंगाबाद व **सीमा पुढीलप्रमाणे आहेत : पूर्वे**ला किंवा त्या दिशेने : २०.०० फू. रुंद रोड; **पश्चिमे**ला किंवा त्या दिशेने : सदर गॅटमधील सिडकोद्वारा संपादित जमीन; **उत्तरे**ला किंवा त्या दिशेने : कचरू राणूजी प्रधान यांची जमीन, **दक्षिणे**ला किंवा त्या दिशेने : पद्माबाई जनार्दन प्रधान यांची जमीन.

अनुसूची-बी : फ्लॅट नं. ए३/ए-२, मोजमापाचा ४०.१५ चौ.मी., बिल्ट-अप एरिआ व मोजमापाचा ५७.७२ चौ.मी., विक्रियोग्य अधिक कॉमन स्पेस, बालकनीज, लॉबीज, स्टेअरकेस, डक्ट्स, टेरेसेस व्यक्तिगत, जर असल्यास, इ. प्रमाणशीर एरिआ, "ए-टाईप" अपार्टमेंट बिल्डिंगच्या स्टिल्ट तळमजल्यावरील, शशी नगरी म्हणून ज्ञात असलेल्या कॉन्डोमिनियममध्ये स्थित, पूर्वोक्त जमिनीवर बांधकाम केलेला व येथे स्थित - गॅट नं. १४०, व्हिलेज तीसगाव, ता. व जि. औरंगाबाद व **सीमा पुढीलप्रमाणे आहेत : पूर्वे**ला किंवा त्या दिशेने : फ्लॅट नं. ए३/बी-१; **पश्चिमे**ला किंवा त्या दिशेने : फ्लॅट नं. ए३/ए-१; **दक्षिणे**ला किंवा त्या दिशेने : सोसायटी गार्डन; **उत्तरे**ला किंवा त्या दिशेने : सोसायटी रोड.

२)	९५८०८९८	**श्रीमती कवीता फसले, श्री. दत्तात्रय फसले**	रु. २०,२५,४५६/- (रुपये वीस लाख पंचवीस हजार चारशे छापन्न फक्त) १९.१०.२०२२	रु. २७,२७,०००/- (रुपये सत्तावीस लाख सत्तावीस हजार फक्त)	रु. २,७२,७००/- (रुपये दोन लाख बहात्तर हजार सातशे फक्त)	प्रत्यक्ष

स्थावर मालमत्तेचे वर्णन : अनुसूची-ए : (जमिनीचे वर्णन) पुढील जमीन मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - गट नं. ८६/पी, एकूण मोजमापाची ४ एकर्स ५ गुंठे भाग १ व भाग २ मध्ये विभागलेली व **भाग १ 'च्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत : पूर्व** : बेंचमार्क कंपाउंड, **पश्चिम** : रोड व गंगामाई लेआउट, **उत्तर** : सिलिंग गट नं. ८६ची जमीन, **दक्षिण** : लाभशेतवार व अन्य संबंधित जमीन गट नं. ८६ची उर्वरित पोर्शन. येथे स्थित - नक्षत्रवाडी, ता. व जि. औरंगाबाद.

अनुसूची-बी : फ्लॅट नं. ए-८, स्टिल्ट पहिल्या मजल्यावरील, मोजमापाचा बिल्ट-अप एरिआ ६१.५५ चौ.मी., (कार्पेट एरिआ ६५.०३ चौ.मी.) "साई श्रद्धा एन्क्लेव्ह" फेज-१ मधील, अनुसूची-ए मध्ये वर्णिलेल्या मालमत्तेवर बांधकाम केलेला आणि **पुढीलप्रमाणे सामायिकरीत्या मिसित : पूर्व** : लिफ्ट व स्टेअरकेस, **पश्चिम** : मार्जिनल स्पेस, **दक्षिण** : फ्लॅट नं. ए-७, **उत्तर** : मार्जिनल स्पेस, येथे स्थित - गट नं. ८६/पी, नक्षत्रवाडी, औरंगाबाद.

३)	९५९९४५७ (रिस्ट्रक्चर अकाउंट - टीसीएचएचएल ०२८१०००१००००७३७३७) व ९६३८९५४ व १०५०६८१०)	**श्री. सुरेश पालवे, श्रीमती प्रमिला सुरेश पालवे**	रु. ३,८८,६४९/- (रुपये तीन लाख अठ्ठ्याऐंशी हजार सहाशे एकोणपन्नास फक्त) ॲग्रीमेंट नं. ९६३८९५४ अंतर्गत तुमच्याद्